हजर होते. त्यावर मी गै.अ. उगले यांना म्हटले की हो गया अपना काम त्यावर गै.अ. उगले यांनी म्हटले की, हो गया ना. असे म्हणून मी व गै.अ. कार्यालयाचे बाहेर पोर्च मध्ये आलो व त्यानंतर मी माझे बुरख्याचे डावे बाजूचे खिशातील लाचेची रक्कम उजवे हाताने काढून गै.अ. यांचे हातात दिली. त्यांनी ती डावे हाताने स्विकारुन व मोजून त्यांचे पॅटचे डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी माझे चेह-यावर हात फिरवून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथक तात्काळ पोहोचून गै. अ. उगले यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर मपोहवा. लता वानखडे यांनी माझे जवळील व्हॉईस रेकॉर्डर काढून ते पो.नि. अवचार यांचे जवळ दिला व त्यांनी तो बंद केला. ती वेळ १३/१३ वा. ची होती. त्यानंतर सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी पो.नि. अवचार यांनी सापळा पंचनाम्या मध्ये घेण्यात आल्या. सदरचा सापळा पंचनामा शासकीय विश्रामगृह पातूर हया ठिकाणी करण्यात आला.

तरी सदर प्रकरणातील आरोपी इतर लोकसेवक प्रमोद तुळशिराम उगले, वय ३७ वर्षे, व्यवसाय-नौकरी, लिपीक, ग्राम पंचायत कार्यालय, शिर्ला अंधारे, ता.पातूर जि.अकोला वर्ग-४, रा. सिदाजी वेटाळ, पातूर ता.पातूर, जि.अकोला यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन स्वत:च्या आर्थिक लाभाकरीता मला माझे मुलीच्या प्लॉटची नोंद ग्रा. पं. चे ८ अ रजिष्टर मध्ये घेवून नमुना ८ अ प्रमाणपत्र देण्याकरीता २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन २०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारली आहे. तरी इलोसे प्रमोद उगले यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून मला वाचून दाखवीण्यात आली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

(बी.डी.अवचार)
पो.नि.अॅ.क.ब्यु., अकोला

**सही**

मुन्नीबी